# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## स्वच्छता विभाग
## जाहिरात

जा.क्र./ स्वच्छता वि./ १९२ / २०२४-२५
दिनांक :- १०/०६/२०२४

जळगांव शहर महापालिकेत स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण कामांकरिता शहर समन्वयक मानधन तत्वावर नेमणे आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी म.न.पा. स्वच्छता विभाग ८ वा मजला, येथे दि. १९/०६/२०२४ संध्या. ०५.०० वाजेपर्यंत शैक्षणिक अर्हतेच्या कागदपत्रांसह अर्ज सादर करावे. छाननीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या दि.२५/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उपायुक्त (आरोग्य) म.न.पा. मजला क्र. २ येथे मुलाखती घेण्यात येतील. मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुलाखती पत्र उमेदवारांनी दिलेल्या ई-मेल वर पाठविण्यात येतील.

| पदनाम | जागा | शैक्षणिक अर्हता | अनुभव | ठोक मानधन |
|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक (city coordinator) | १ | A) मान्यताप्राप्त विद्यापीठातील खालील पैकी कोणत्याही शाखेतील पदवी<br>१. बी.ई. / बी.टेक. (कोणतीही शाखा)<br>२. बी. आर्क<br>३. बी. प्लॅनिंग<br>४. बी.एस.सी. (कोणतीही शाखा)<br>B) संगणकाचे हाताळणीचे संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक<br>C) मराठी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडित कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे. | रु.४५,०००/- प्रति माह |

**अपेक्षित कामाचे स्वरूप :**

१. उमेदवाराची नियुक्ती झाल्यानंतर महानगरपालिकामार्फत स्वच्छ भारत अभियान अंतर्गत करण्यात येणाऱ्या खालील कामाचे दैनंदिन पर्यवेक्षण करणे. माहिती अहवाल तयार करणे, क्षेत्रियस्तरावर अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करणे, अहवाल वेळोवेळी शासनास पाठविणे इ. प्रकारची कामे करावी लागतील.

अ. हागणदारी मुक्त शहरासंबंधीची कामे (ODF ++)

ब. स्वच्छ सर्वेक्षण २०२४ च्या अनुषंगीक कामे

क. कचरा मुक्त शहर अंतर्गत ३,५,७ स्टार मानांक मिळविणे संबंधित कामे

२. मा. आयुक्त यांनी नेमून दिलेली स्वच्छता विभागातील इतर आनुषंगीक कामे.

**उमेदवारांसाठी सुचना :**

१. मा. आयुक्त, जशमनपा यांचे अध्यक्षतेखाली मुलाखत प्रक्रियेद्वारे उमेदवारांची निवड केली जाईल.

२. प्रत्यक्ष मुलाखतीत उमदवारांचे वरील नमूद बाबींचे / विषयांचे योजनांबाबतचे ज्ञान तसेच संगणक आणि मराठी, इंग्रजी भाषेचे ज्ञान तपासले जाईल.

३. मुलाखतीच्या ठिकाणी निश्चित केलेल्या वेळेमध्ये उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता व अनुभव इ. आवश्यक प्रमाणपत्रांची मूळ प्रत व एक स्वयंसाक्षांकीत प्रतींचा संच यासहीत स्वखर्चाने उपस्थित रहावे.

४. उमेदवारांनी केंद्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजनेबाबत व तत्सम तांत्रिकबाबतचे सादरीकरण तयार करून सादर करावयाचे आहे.

उमेदवाराचे वय दि०१/०६/ २०२४ रोजी ३५ वर्षापेक्षा अधिक नसावे. (शहर समन्वय म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथिल करता येईल.)

६. नियुक्ती पत्र मिळाल्यावर उमेदवारास विना विलंब, स्वच्छता विभाग, म.न.पा. जळगांव येथे रुजू व्हावे लागेल.

**अटी व शर्ती :**

१. उमेदवारांचे आधार कार्ड व पॅनकार्ड असणे आवश्यक आहे.

२. सदर पदावरील नियुक्ती ही पूर्णतः कंत्राटी तत्वावर राहील.

३. सदर कर्मचाऱ्यास शासकीय कर्मचाऱ्यास मिळणाऱ्या कोणतेही लाभ / सुविधा मिळणार नाही.

४. सदर नियुक्ती किमान ११ महिने कालावधीसाठी राहिल.

५. नियुक्ती कालावधी संपल्यानंतर मुदतवाढ देणे बाबत मा. आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहिल. तसेच या नियुक्तीस स्थायित्व देण्यात येणार नाही.

६. सदर अटी व शर्ती व नियुक्ती प्रक्रियेत बदल करण्याचे तथा रद्द करण्याचे राखीव अधिकार मा. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचेकडे आहेत.

७. कंत्राटी शहर समन्वयक (सिटी कॉर्डिनेटर) यांना कोणतेही शासकीय लाभ प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे मिळणार नाहीत अथवा त्यांना कसल्याही प्रकारचे वेतन भत्ते अदा केले जाणार नाहीत.

(मा. आयुक्त यांचे दि.०६/०६/२०२४ रोजीच्या मान्यतेने.)

-Sd-
(अविनाश गांगोडे)
उपायुक्त,
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

Mahabharti.in